कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष नीलेश हेलोंडे यांची सूचना

# येत्या दहा दिवसांत ई क्लास जमिनीवर पशूधनासाठी चाऱ्याची लागवड करा

प्रतिनिधी | बुलडाणा

पशुधनाला गावातच वैरण उपलब्ध होण्यासाठी येत्या दहा दिवसात ई-क्लास जमिनीवर चाऱ्याची लागवड करावी, असे आवाहन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

आज शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत त्यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे आदी उपस्थित होते. शेतकरी आत्महत्येबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. कमी वयात होणाऱ्या आत्महत्या हा चिंतेचा विषय झाला आहे. तरूण शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी शेतीसह शेतकऱ्यांनी दुधाळ जनावर पाळणे आवश्यक आहे. या जनावरांना मुबलक चारा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांकडील पशुधन वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे येत्या दहा दिवसात चारा लागवड करण्याच्या सूचना ॲड. हेलोंडे यांनी दिल्या.



कै वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष नीलेश हेलोंडे अधिकाऱ्याची चर्चा करतांना बाजुला जिल्हाधिकारी डॉ. पाटील व अन्य.

## सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत्न करा

शेतकऱ्यांमध्ये येणारे नैराश्य घालविण्यासाठी प्रेरणा प्रकल्प राबवण्यात यावा. यात नियमित स्वरूपात शेतकऱ्यांची तपासणी करावी. ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासाच्या योजनांची माहिती व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीमध्ये योजनांची माहिती लावण्यात यावी. इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळत नाही. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत्न करावे , अशा सूचनाही दिल्या.

Scanned with OKEN Scanner

# ई-क्लास जमिनीवर चारा लागवडीचे निर्देश

## शेती स्वावलंबन मिशनच्या अध्यक्षांनी घेतला आढावा: शेतकऱ्यांनी शेतीसह पशुधन पाळावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** कमी वयात होणाऱ्या आत्महत्या हा चिंतेचा विषय झाला आहे. तरूण शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी शेतीसह शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरे पाळणे आवश्यक आहे. या जनावरांना मुबलक चारा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांकडील पशुधन वाढण्यास मदत होणार आहे. पशुधनाला गावातच वैरण उपलब्ध होण्यासाठी येत्या दहा दिवसात ई-क्लास जमिनीवर चाऱ्याची लागवड करावी असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत दि.३० जुलै रोजी आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे उपस्थित होते. प्रत्येक ग्रा.पं.मध्ये पीकविमा प्रतिनिधीच्या क्रमांकाचा बोर्ड लावावा. जैविक प्रयोगशाळा शिबिर घ्यावेत, बाजार समितीच्या आवारात हमीभाव दर्शविणारा फलक लावावा, धरमकाटा असलेल्या ठिकाणी त्याच्या व्यवस्थापकाचा क्रमांक लावण्यात यावा, त्यामुळे शेतकऱ्यांना समस्या मांडता येतील. शेतकऱ्यांमध्ये येणारे नैराश्य घालविण्यासाठी प्रेरणा प्रकल्प राबविण्यात यावा, यात नियमित स्वरूपात शेतकऱ्यांची तपासणी करावी अशा सूचना हेलोंडे पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

### 'त्या' विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत्न व्हावेत

ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासाच्या योजनांची माहिती व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीमध्ये योजनांची माहिती लावण्यात यावी. इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या योजनेतून सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे, अशा सूचनाही ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी दिल्या.

Scanned with OKEN Scanner

# ई-क्लास जमिनीवर चाऱ्याची लागवड करावी-ॲड. हेलोंडे



**बुलडाणा (जिमाका):** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत आढावा बैठक घेतली. पशुधनाला गावातच चैरण उपलब्ध होण्यासाठी येत्याा दहा दिवसात ई-क्लास जमिनीवर चाऱ्याची लागवड करावी, असे आवाहन ॲड. हेलोंडे यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे आदी उपस्थित होते.

शेतकरी आत्महत्येबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. कमी वयात होणाऱ्या आत्महत्या हा चिंतेचा विषय झाला आहे. तरूण शेतकऱ्यांच्या आत्ममहत्येचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी शेतीसह शेतकऱ्यांनी दुधाळ जनावर पाळणे आवश्यक आहे. या जनावरांना मुबलक चारा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांकडील पशूधन वाढण्यास मदत होणार आहे. त्याामुळे येत्या दहा दिवसात चारा लागवड करण्याच्या सूचना ॲड. हेलोंडे यांनी दिल्या.

यासोबतच बैठकीत प्रत्योक ग्रामपंचायतीमध्ये पिक विमा प्रतिनिधीच्या क्रमांकांचा बोर्ड लावावा. जैविक प्रयोगशाळा शिबीर घेण्यात यावेत. बाजार समितीच्या आवारात हमीभाव दर्शविणारा फलक लावण्यात यावा. धरमकाटा असलेल्या ठिकाणी त्याच्या व्यवस्थापकाचा क्रमांक लावण्यात यावा, असे झाल्यास शेतकऱ्यांना संबंधित क्रमांकावर संपर्क साधून समस्या मांडता येतील. शेतकऱ्यांमध्ये येणारे नैराश्य घालविण्यासाठी प्रेरणा प्रकल्प राबविण्यात यावा. यात नियमित स्वरूपात शेतकऱ्यांची तपासणी करावी. ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासाच्या योजनांची माहिती व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीमध्ये योजनांची माहिती लावण्यात यावी. इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या योजनेतून सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत करण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

Scanned with OKEN Scanner

# चारा लागवडीसाठी शेती मिशनच्या अध्यक्षांचे आवाहन

«बुलडाणा |प्रतिनिधी »

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत आढावा बैठक घेतली. पशुधनाला गावातच वैरण उपलब्ध होण्यासाठी येत्या दहा दिवसात ई-क्लास जमिनीवर चाऱ्याची लागवड करावी, असे आवाहन ॲड. हेलोंडे यांनी केले.




यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे आदी उपस्थित होते. शेतकरी आत्महत्येबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. कमी वयात होणाऱ्या आत्महत्या हा चिंतेचा विषय झाला आहे. तरूण शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी शेतीसह शेतकऱ्यांनी दुधाळ जनावर पाळणे आवश्यक आहे. या जनावरांना मुबलक चारा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांकडील पशूधन वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे येत्या दहा दिवसात चारा लागवड करण्याच्या सूचना ॲड. हेलोंडे यांनी दिल्या. यासोबतच बैठकीत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पिक विमा प्रतिनिधीच्या क्रमांकांचा बोर्ड लावावा. जैविक प्रयोगशाळा शिबीर घेण्यात यावेत, बाजार समितीच्या आवारात हमीभाव दर्शविणारा फलक लावण्यात यावा. धरमकाटा असलेल्या ठिकाणी त्याच्या व्यवस्थापकाचा क्रमांक लावण्यात यावा, असे झाल्यास शेतकऱ्यांना संबंधित क्रमांकावर संपर्क साधून समस्या मांडता येतील. शेतकऱ्यांमध्ये येणारे नैराश्य घालविण्यासाठी प्रेरणा प्रकल्प राबविण्यात यावा. यात नियमित स्वरूपात शेतकऱ्यांची तपासणी करावी. ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासाच्या योजनांची माहिती व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीमध्ये योजनांची माहिती लावण्यात यावी. इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या योजनेतून सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

Scanned with OKEN Scanner

# राज्यमंत्री ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांचा बुलडाणा जिल्हा दौरा

**बुलडाणा** | कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील मंगळवार, दि. ३० जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दुपारी ३.३० वाजता शासकीय विश्राम गृह, बुलडाणा येथे आगमन व राखीव, दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी ४.३० वाजता जिजामाता महाविद्यालयातील ग्रंथालय व अभ्यासिकेची पाहणी करतील. त्यानंतर दुपारी ५ वाजता अमरावती -काटोलकडे रवाना होतील.

Scanned with OKEN Scanner

# राज्य मंत्री एड. नीलेश हेलोंडे पाटिल का दौरा

जिला संवाददाता| बुलढाणा

वसंतराव नाइक कृषि स्वावलंबन मिशन के अध्यक्ष एड नीलेश हेलोंडे पाटिल मंगलवार ३० जुलाई को जिले के दौरे पर आ रहे हैं। मंत्री पाटिल की यात्रा के अनुसार, ३० जुलाई को दोपहर ३.३० बजे शासकीय विश्राम गृह, बुलडाणा में आगमन एवं रिजर्व, दोपहर ३ बजे कलेक्टोरेट में आयोजित बैठक में भाग लेंगे। शाम ४.३० बजे जीजामाता महाविद्यालय के पुस्तकालय एवं पाठ्यपुस्तकों का निरीक्षण करेंगे। फिर शाम ५ बजे अमरावती-काटोल के लिए रवाना होंगे।

Scanned with OKEN Scanner

# राज्यमंत्री ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

देशोन्नती वृत्तसंकलन

**बुलढाणा** : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील मंगळवार ३० जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

ना. पाटील यांच्या दौऱ्यानुसार ३० जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता शासकीय विश्राम गृह, बुलडाणा येथे आगमन व राखीव, दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस उपस्थित राहतील.

दुपारी ४.३० वाजता जिजामाता महाविद्यालयातील ग्रंथालय व अभ्यासिकेची पाहणी करतील. त्यानंतर दुपारी ५ वाजता अमरावती -काटोलकडे रवाना होतील.

(जिमाका)

Scanned with OKEN Scanner

दै. तरुण भारत
दि २७/७/२५

# राज्यमंत्री ॲड. नीलेश हेलोंडे यांचा दौरा

**बुलढाणा** : वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील मंगळवार, ३० जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. पाटील यांच्या दौऱ्यानुसार ३० जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे आगमन व राखीव, दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी ४.३० वाजता जिजामाता महाविद्यालयातील ग्रंथालय व अभ्यासिकेची पाहणी करतील. त्यानंतर दुपारी ५ वाजता अमरावती काटोलकडे रवाना होतील.

Scanned with OKEN Scanner